# येशूजन्म - आचरणशुचितेचा आविष्कार

आचार्य काका कालेकर यांनी आपल्या 'धर्मकुटुंब' या लेखात येशू ख्रिस्ताबद्दल लिहिले आहे, 'क्षमाधर्मी, अनन्य ईश्वरनिष्ठ, परम भागवत, ब्रह्मचारी येशू कोणत्याही धर्मातील लोकांना पूज्य वाटला पाहिजे.' आचार्यांचे कथन वस्तुनिष्ठ आहे. कारण येशूने दिलेली शिकवण अखिल मानवासाठी आहे. मानवाचे भले करणारी आहे. त्याचप्रमाणे व्यावहारिकदेखील आहे.

येशूच्या विचारातील 'देवाचे राज्य' किंवा 'स्वर्गाचे राज्य' प्रत्येक माणसाच्या अंतःकरणाच्या शुचितेमध्ये आहे. माणसामाणसातल्या चांगल्या संबंधांमध्ये आहे. येशू म्हणतो, "जे अंतःकरणाचे शुद्ध' ते धन्य, कारण ते देवाला पाहतील." अनंत काळापासून चाललेला देवाचा शोध येशूने माणसाच्या इतक्या जवळ आणून ठेवला आहे. देव आणि माणसातील संबंध पिता-पुत्राचे आहेत, असे सांगून येशू ख्रिस्त प्रत्येक माणसाला आवाहन करतो, 'जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे, तसे तुम्ही पूर्ण व्हा.' हे पूर्णतेचे आवाहन म्हणजे पर्यायाने माणसाने स्वप्रयत्नाने देव बनण्याचे आवाहन आहे. 'देव जसा पवित्र आहे, तसे तुम्हीही सर्व प्रकारच्या आचरणांमध्ये पवित्र व्हा', अशी अपेक्षा व्यक्त करताना येशू आचरणशुचितेला तसेच आंतरिक शुचितेला जीवनात अनन्यसाधारण महत्त्व देतो. आजच्या जगाकडे दृष्टिक्षेप टाकला तर ठळकपणे साधनशुचितेचा, आचरणशुचितेचा अभाव सर्वत्र दिसून येतो. आंतरिक शुचितेचा लोप झाल्यामुळे व्यभिचार, भ्रष्टाचार, अत्याचार, अन्याय याचे तण माणसाच्या वैयक्तिक जीवनात, सामाजिक जीवनात, पर्यायाने राष्ट्रीय जीवनातदेखील फोफावलेले दिसते. चांगुलपणाचे, शुचितेचे पीक यामुळे खुरटले जाणार की काय, असा धोका निर्माण झाला आहे.

अनीतीमुळे माणसातील प्रेमभावना थंडावली आहे. संपत्ती व सत्तेचा मोह, स्वार्थांधता यामुळे माणसाच्या जीवनात असमतोल आला आहे. हा असमतोल माणूसच आपल्या आचरणशुचितेने करू शकेल, असा येशूचा विश्वास आहे. प्रत्येक माणूस चांगला बनला तर अखिल विश्व चांगले बनेल आणि विश्वात आनंदाचे, शांतीचे, प्रीतीचे परस्परविश्वासाचे साम्राज्य नांदू शकेल, असे येशूला वाटते. 'देवसम शुचिते'वरील विश्वासानेच विश्व तरेल हे येशू ख्रिस्ताच्या बोध वचनांचे सार आहे.

या अपेक्षित 'शुचिते'चे व्यावहारिक प्रतिपादन अत्यंत सोपेपणाने येशू करतो. आंतरिक शुचितेबद्दल सांगताना तो म्हणतो, 'पहिल्याने वाटी आतून साफ कर, म्हणजे ती बाहेरूनही साफ होईल.' मनुष्याचे अंतरंग चांगले झाले तर त्यामधून चांगलेच बाहेर निघेल, हे स्पष्ट करताना त्यानं सांगितलंय, 'चांगला मनुष्य आपल्या अंतःकरणातील चांगल्या भांडारातून चांगले काढतो. वाईट मनुष्य वाईटातून वाईट काढतो: कारण अंतःकरणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार.' याही पलीकडे जाऊन शुचितेचे विश्लेषण करताना येशू ख्रिस्त सांगतो, "जे काही बाहेरून माणसामध्ये जाते, ते त्याला अपवित्र करते. कारण आतून म्हणजे मनुष्याच्या अंतःकरणातून दुष्ट विचार, खून, व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, शिव्यागाळीही निघतात." या वस्तुनिष्ठ विवेचनाचा सूक्ष्मपणे विचार केल्यास वरील वाईट विचार अंतःकरणात येता क्षणीच माणूस पापाचरण

करीत असतो. ही प्रक्रिया मुळातूनच नष्ट व्हावी हा येशूचा प्रयत्न आहे. तो म्हणतो, "चांगले झाड चांगले फळ देते. वाईट झाड वाईट फळ देते. फळावरून लोक ओळखता येतात."

सत्कर्मशीलता, सदाचारप्रियता ही आजच्या जगाची गरज आहे. ही गरज सार्वत्रिक आहे, धर्मातीत आहे, भेदातीत आहे, राष्ट्रातीत आहे, हे येशूने ओळखले होते. म्हणूनच तो कुठलाही धर्म स्थापन करण्याच्या भानगडीत पडला नाही. जगातल्या प्रत्येक माणसाने शुद्धाचरणाने 'देव' बनावे म्हणजे या पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल, असा व्यापक 'विश्वमानव धर्म' त्याला अपेक्षित होता. राष्ट्राराष्ट्रांच्या सीमांचे रक्षण करण्याच्या निरर्थ प्रयत्नांमधून होणारा नरसंहार व पर्यायाने मानवतेची होणारी हानी त्याला मान्य नव्हती. येशूने महत्त्व दिले माणसाच्या अंतःकरणाचे रक्षण करण्याला. कारण या अंतःकरणातच, शाश्वत टिकणाऱ्या जीवनाचा, जीवनमूल्यांचा उगम आहे हे त्याला उमगले होते.

आचरणशुचितेच्या आड येणाऱ्या दुर्विचारांना, दुष्कृत्यांना, क्षमाशीलतेच्या आणि प्रीतीच्या मार्गाने दूर करण्याचा आगळावेगळा प्रयोग येशूने आचरून दाखविला. त्याने शेजाऱ्यावर स्वतःइतकीच उत्कट प्रीती करा, असे सांगितले. क्षमाशीलतेची परमसीमा ओलांडताना तो सांगतो, "तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती

करा, जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. म्हणजे तुम्ही आपल्या स्वर्गीय पित्याचे पुत्र व्हाल. कारण तो वाईटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगवितो आणि धार्मिकांवर व अधार्मिकांवरही पाऊस पाडतो.'' देवाच्या या 'समाचरणा'चे मर्म येशूने जाणले होते, म्हणूनच त्याने पापी माणसाचा तिरस्कार केला नाही; तर संधी मिळण्याचा आग्रह धरला. निरोग्यांना वैद्याची गरज नाही, तर रोग्यांना आहे, असे म्हणत तो वाईट वागणाऱ्या लोकांना चांगले वागण्याचे शिक्षण देत राहिला. एकमेकांच्या अपराधांची क्षमा जर आपण एकमेकांना केली तर साहजिकच कटुता दूर होऊन शांती नांदेल, आनंद नांदेल, असा सहज सिद्धान्त येशूने सांगितला. 'लोकांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हाला वाटते तसे तुम्ही त्यांच्याशी वागा', हे अत्यंत व्यावहारिक सूत्रे त्याने सांगितले.

'पहिल्याने आपल्या डोळ्यातील मुसळ काढ, म्हणजे आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ काढावयास तुला स्पष्ट दिसेल', अशा दृष्टान्ताद्वारे माणसाने व्यवहारात कसे वागावे याचा बोध केला. 'दुर्जन बढती पावले म्हणजे गुन्हे वाढतात' हे त्याचे विधान म्हणजे आजच्या वाढत्या गुन्हेगारीबद्दल केलेले अचूक भाष्य वाटते. 'ज्या मापाने तुम्ही माप घालता त्याच मापाने तुमच्या पदरी पडेल' असा सावधानतेचा इशारा तो देतो व सूचित करतो, की शुचितेचे माप घाला म्हणजे तुमच्या पदरी शुचिता पडेल. प्रेम द्या; प्रेम लाभेल. वैऱ्याशीही प्रेमाने

वागा म्हणजे तो विचारात पडेल आणि पुढे त्याचे परिवर्तन चांगल्या माणसात होऊ शकेल.

वाईट माणसाला चांगले करणे, चांगल्या माणसाला अधिक चांगले करणे हा येशूंचा ध्यास होता. त्याचे माणसावर, त्याच्या चांगुलपणावर जितके प्रेम होते, त्याहून अधिक प्रेम वाईट मार्गाकडे गेलेल्या माणसावर होते. कारण पापमार्गात बहकलेल्या अशा मेंढरांना देवाकडे परत आणणे हेच त्याचे जीवित कार्य होते. येशू ख्रिस्ताच्या जन्म सोहळ्याच्या म्हणजे नाताळच्या निमित्ताने त्याने प्रतिपादलेल्या या उदात्त 'आचरण सूत्रांचे' परिशीलन करणे अगत्याचे आहे. कारण देवाचे पूजन मानवी हातांनी बनविलेल्या मंदिरांमधून, प्रार्थनालयांमधून करायचे नसून तत्त्वाच्या व सत्याच्या स्वरूपात वैयक्तिक जीवनात आंतरिक शुचिता, साधनशुचिता व आचरणशुचिता पाळून करायचे आहे. हे येशू ख्रिस्ताने आधी स्वतः आचरून नंतर सांगितले आहे. बर्नार्ड शॉ म्हणतात, ''येशूची शिकवणही विजेच्या शक्तीसारखी आहे. फक्त त्या शक्तीला जगाचे प्रश्न सोडविण्याच्या कामी क्रांतिकारक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने जुंपता येईल, अशा प्रकारे तिचा उपयोग करून घेण्यास सोईच्या अशा यांत्रिक शोधांची आवश्यकता आहे.'', असा शोध लावून सारे विश्व मंगल, शुभ, आनंदमय करण्याची जबाबदारी अर्थात माणसाचीच आहे. माणसाचे चांगले होणे विश्वाला चांगले करू शकते, हे माणसाला पटते आहे. फक्त विकार सद्विचार आणि सदाचारावर मात करीत आहेत. त्यासाठी अंतःकरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारायला हवी, हाच ख्रिस्तजन्माचा संदेश आहे. कारण येशूचा जन्म आचरणशुचितेचा मनोरम आविष्कार आहे.

**- जयंतकुमार त्रिभुवन**